# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

दिनांक :– 22.01.2025

जा. क्र. विअ/निविदा/2136/2025,

"अल्पमुदती निविदा सुचना क्र. 21, सन 2024–2025"

विद्यापीठ अभियंता, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला हे विद्यापीठाचे 39 व्या दिक्षांत समारोहाकरिता खालील नमुद तात्पुरत्या स्वरूपात करावयाच्या कामांसाठी इच्छुक मंडप कंत्राटदार व विद्युत कंत्राटदारांकडून दरपत्रके मागवित आहेत.

1) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे 39 व्या दिक्षांत समारोहाकरिता कार्यक्रमस्थळी तात्पुरत्या स्वरूपात खुर्च्या, कनाती, मॅटींग, भोजन मंडप इ. व्यवस्थेसह इतर आवश्यक बाबी पुरविणे.
2) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे 39 व्या दिक्षांत समारोहाकरिता कार्यक्रमस्थळी व भोजन मंडपात तात्पुरत्या स्वरूपात विद्युत व्यवस्था उभारणे.

वरील दोनही कामांचे कोरे दरपत्रके, सविस्तर माहिती, शर्ती व अटी इ. कार्यालयीन वेळेत कार्यालयास प्रत्येक कामाकरिता स्वतंत्ररित्या **रू. 1000/– + GST** चा रोख भरणा केल्यानंतर देण्यात येतील.

कोरे दरपत्रके विक्री दिनांक 22.01.2025 पासून 24.01.2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी 10.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत राहील. यानंतर कोणतेही दरपत्रके देण्यात येणार नाही.

योग्य दर भरल्यानंतर सिलबंद दरपत्रके कार्यालयात दि. 27.01.2025 रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी 10.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

सिलबंद दरपत्रके सादर करतांना "**विद्यापीठ अभियंता, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**" या नावाने 6 महिने कालावधीचा राष्ट्रीयकृत बँक अथवा शेडयुल्ड बँकेचा रू. 25,000/– एवढया रकमेचा FDR बयाणा रक्कम म्हणून जोडणे आवश्यक आहे.

प्राप्त झालेली सिलबंद दरपत्रके शक्यतो त्याच दिवशी दि. 27.01.2025 अथवा पुढील तारखेस उघडण्यात येतील.

को–या दरपत्रकात उल्लेख केलेले आवश्यक दस्तऐवज व रू. 25,000/– रक्कमेचा FDR जोडणे अत्यावश्यक आहे. सदर निविदा सुचना विद्यापीठाच्या **www.pdkv.ac.in** या वेबसाईटवर प्रकाशित करण्यात येत आहे. निवदा रक्कमेचा भरणा केल्यानंतर उपरोक्त वेबसाईटवरून निविदा प्रपत्राचा अपलोड करून या कार्यालयास वरील नमुद दिनांकास प्रत्यक्षरित्या दोन लिफाफा पध्दतीमध्ये सादर करणे अनिवार्य राहील.

**निविदा उघडणे, खारीज करणे इत्यादी निविदेबाबतचे सर्व अधिकार विद्यापीठ अभियंता कार्यालयाकडे राखीव राहतील. याबाबत निविदाकारास कोणतेही कायदेशीर हक्क बजावता येणार नाहीत.**

विद्यापीठ अभियंता
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला